VYAS
Rajesh Vyas Group

# ऋणानुबंध

September 2023 Edition

वर्ष २ अंक २

## संपादकीय

मित्रांनो, आता आपण सोसायटीच्या पुनर्विकसनाकरिता विकसकाची निवड केली आहे.

आता विकसकाने सोसायटीच्या प्लॉटची सरकारी मोजणी करुन घेणे आवश्यक आहे. जेणेकरुन सोसायटीने दिलेले प्लॉटचे क्षेत्रफळ, आकारमान तपासले जाईल आणि पुनर्विकासाकरिता लागणारे Floor Plans बनविणे सोयीचे होईल. याकरिता सोसायटीकडे पूर्वीची सरकारी मोजणीची प्रत असल्यास विकसकांना त्याचा नक्की उपयोग होऊ शकतो. सोसायटीच्या प्लॉटमध्ये काही अतिक्रमण झाले असल्यास त्याचेदेखील परिक्षण होते.

आता तुम्हाला सोसायटीचे वास्तुविशारद (आर्किटेक्ट) आणि विधी सल्लागार यांच्याबरोबर संवाद साधायचा आहे म्हणजेच आपले Legal documents आणि Floor Plans फायनल करणे.

सर्वप्रथम, तुम्ही आपल्या सोसायटीच्या सभासदांकडून विकसक देत असलेल्या फ्री एरिया व्यतिरिक्त जास्त क्षेत्राची नोंद घ्यावी. शक्य झाल्यास त्यांच्या फ्लॅटमधील काही अपेक्षा असल्यास जसे खोलींचे क्षेत्रफळ, फ्लॅटची नवीन इमारतीत येणारी जागा, शेजारी इ. सर्व सभासदांची ही माहिती संकलित करुन विकसकाकडे द्यावी, जेणेकरुन त्याला त्याच्या वास्तुविशारद (आर्किटेक्ट) कडून आपल्या इमारतीचा Floor Plan बनविणे सोयीचे जाईल. सोसायटी जेवढी माहिती अचूक देईल तेवढा सभासदांच्या अपेक्षांना पूर्ण करणारा Floor Plan बनविणे विकसकास शक्य होते. पहिला Floor Plan आल्यानंतर सभासद तो सोसायटीच्या वास्तुविशारद (आर्किटेक्ट) कडून तपासून घेऊन गरज भासल्यास त्यात सूचना, दुरुस्ती सुचवू शकतात. अशा ३/४ दुरुस्त्यांनंतर सोसायटी Floor Plan Final करु शकते.

आता Floor Plan हातात आल्यानंतर सोसायटीच्या सभासदांनी आपापल्या सदनिकांची निवड करणे अपेक्षित आहे. सदनिका निवड करताना बरेचदा एकाच फ्लॅटची २/३ सभासद आपली निवड करतात. हयावेळेस चिठ्ठी टाकून हा गुंता सोडविणे सोयीचे ठरते. शेवटी काय...! आपली सहकारी गृहरचना संस्था असल्याने अशा छोटया छोटया अडचणींवर आपल्यालाच मार्ग काढावा लागतो.

आता सभासदांची आपापल्या पसंतीची सदनिका निवडून झाल्यानंतर आपण पुढील लेखामध्ये विकसन करारनामा संदर्भात काय प्रक्रिया असते हे सविस्तरपणे समजावून घेऊयांत..!

## अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| संपादकीय | ०१ |
| माझे आवडते गाणे | ०२ |
| पाककृती | ०५ |
| वाढदिवस | ०६ |
| सोहळा | ०७ |
| रणजित हाईटस् फ्लॅट हस्तांतरण | ०७ |
| रणजित हाईटस् सोसायटी हस्तांतरण | ०९ |
| भुमिपूजन | १० |
| कविता | १३ |
| किडस् झोन | १४ |
| साईट अपडेटस् | १५ |
| वाचकांसाठी आवाहन | १६ |



# माझे आवडते गाणे



'मन उधाण वाऱ्याचे' हे सौमित्र या कवींचे काव्य मला मनापासून आवडले. त्याची चाल ही प्रसिद्ध संगीतकार अजय-अतुल यांची. त्यांनी संगीतबद्ध केलेल्या हया काव्याची चालही मनात रेंगाळणारी असल्याने तसेच शब्द अर्थपूर्ण, भावनात्मक असल्याने सतत गुणगुणावे असे वाटते. वास्तविक हे काव्य 'सौमित्र' यांचे म्हणजेच कवीचे मन दुःखी असताना केलेले काव्य. पण त्याची चाल अशी आहे की त्यातून सुखाची भावना निर्माण होते, असे खुद्द कवीनेच सांगितले आहे.

कवीची 'वाऱ्यासारखे मनाला उधाण आले' ही कल्पना इतकी चपखल आहे की असे वाटते, आपल्याही मनात हया भावना येतात पण त्या अचूक शब्दात कागदावर उतरवता येत नाहीत. असे हे मनाला आलेले उधाण पावसाशी गूज करते. किती सुसंगत काव्य! मन हा विषयच मुळात गूढ. मोजक्या शब्दात मनाचे वर्णन करणे कठीण. मन बेभान का होतं, ते कसं गहिवरतं, ते गुणगुणतं, कधी गुंततं, कधी हरवतं हया सर्वसामान्यांना प्रतीत होणाऱ्या भावना. हयातच त्या काव्याची समर्पकता दिसून येते. आपले भाव कवीने शब्दात उतरविले की मन कसे आनंदून जाते.

आकाशरुपी स्वप्नात मन हरपून जाते, हुरहुरत्या सांजेला एकटेच झुरते, सावरते, बावरते, घडते, अडखळते, पडते काय अचूक शब्द निवडलेत! हे वेडे मन कधी आशेच्या हिंदोळयावर झुलते, पाण्यावर तरंग होऊन फिरते अन् क्षणात फिरुन आभाळाला भिडते - किती तरल भावना हया! मायेच्या हळव्या स्पर्शाने ते फुलते तर नात्याच्या बंधात धुंद होऊन मोहरते. अहाहा! असे वाटते कवीने इथे थांबूच नये. काव्य असेच ओघवत्या शब्दात नदीच्या प्रवाहाप्रमाणे पुढे न्यावे. गहिऱ्या डोळयांच्या डोहात बुडणारे मन, बुडणारे मन, भाबडे तळमळणारे मन कधी भरकटते तर कधी हे वेडे मन मोहाच्या शब्दात चपखलपणे केलेले वर्णन मनाला हर्ष देऊन न जाईल तरच नवल.

आपल्या आवाक्यापलीकडे भावना गेल्या की त्या तीव्र स्वरुप धारण करतात कधी हर्ष, कधी दुःख तर कधी उदासिनता असे त्यांचे स्वरुप असते. परंतु 'सौमित्र' या कवींच्या भावना हया हळुवार, अलगदपणे स्वरुप बदलणाऱ्या आहेत. मनाचे तरंग हेलकावे खात एका भावनेतून दुसऱ्या भावनेस स्पर्श करतात. त्यातून सुखद अनुभव निर्माण होतो, ही हया काव्याची खासियत आहे. काव्यातूनच कवी समजतो - किती मुलायम, हळुवार मनाचा हा कवी आहे ते.

गाणी तर मला पुष्कळ आवडतात. त्यातील काव्यही समर्पक वाटते. पण ज्या गाण्यातले शब्द-भावना मनाला स्पर्शून जातात - ती हृदयात जागा करुन बसतात. असेच हे गीत आणि ते लिहिणारा कवी माझ्या मनात घर करुन बसले आहेत. हीच त्या कवीला व काव्याला मिळणारी दाद.


**– सौ. मृदुला थोरात**

३१ आयडियल सोसायटी,

आयडियल कॉलनी,

पौड रोड, पुणे - ४११०३८.

मोबाईल - ९५०३०१७९३०

वय - ७४ पुर्ण.




# माझे आवडते गाणे



काही गाणी चिरंतनाचे लेणे झालेली असतात. हिंदी चित्रपटांच्या सुवर्णकाळातून बाहेर पडणे खरोखरच कठीण आहे. एका पेक्षा एक सरस गाणी रुंजी घालीत असतात. काही गाणी तर हृदयाचा अक्षरशः ठाव घेतात, 'जुनं ते सोनं' याची प्रचिती देणारी असंख्य गाणी या काळात जन्माला आली आणि अजरामर झाली. गीतकार, संगीतकार आणि गायक-गायिका यांची प्रतिभा एकत्र आली की अशा उत्तमोत्तम गाण्यांची निर्मिती होते आणि ती रसिकांच्या मनावर अधिराज्य करतात. साध्या शब्दांत मोठा आशय सांगण्याची काही गीतकारांची खासियतच असते. अशी किती गाणी सांगावीत? सुरेल, सुमधूर आणि भावनाप्रधान गीतांनी हा सुवर्णकाळ अजरामर केला. या गीतांचा आस्वाद, आनंद रसिक आयुष्यभर घेत राहिला. या अशा खजिन्यातून आवडत्या अशा एका गीताची निवड करणे म्हणजे इतर उत्तमोत्तम गीतांवर अन्याय करण्यासारखे आहे. तरी सुद्धा ज्या गाण्याने रसिक श्रोत्यांना पिढयान्‌पिढया चांदण्यात मनसोक्त भिजण्याचा आनंद दिला ते गीत म्हणजे 'चोरी चोरी' चित्रपटातील 'आजा सनम मधुर चांदनी में हम' १९५६ चा हा चित्रपट! साठ सालांहून अधिक वर्षे होऊन गेली तरी नव्या युवक-युवतींना हे गाणे आजही आपलेसे वाटते कारण त्या गीतातील तारुण्य सुलभ प्रेमभावना! गीतकार हसरत जयपुरी, संगीतकार शंकर - जयकिसन, लता-मन्नाडे यांचा रोमँटिक स्वर आणि राज-नर्गिसचा अतिशय सहज सुंदर अभिनय, राजकपूरचा विलक्षण बोलका चेहरा आणि नर्गिसची त्याला मोहक साथ! सर्वच काही अप्रतिम! एखादी कलाकृती निर्माण होते तेव्हा कलावंतांनी आपले कसब त्यात ओतलेले असते, तेव्हाच अशी अजरामर गाणी श्रोत्यांच्या काळजाचा ठाव घेतात.

या मधुर गाण्याला संगीत दिले आहे शंकर-जयकिसन यांनी! गाण्याची अफलातून चाल! चित्रपटाच्या निर्मात्यांना मुकेशला घ्यायचं होतं पण संगीतकार जोडीच्या आग्रहामुळे मन्नाडे यांना ही गाणी मिळाली. गाण्याचा प्रणयोत्सुक स्वर आणि बेचैनी मन्नाडे यांच्या आवाजातून तीव्रतेने रसिकांच्या मनाला भिडते.

गाण्याच्या सुरुवातीला अकॉर्डियनचा सुरेख वापरामुळे सुरांची सुंदर लय साधली गेली आहे. याचा आनंद घेत असतानाच लता दिदिंचा 'आ जा सनम' असा स्वर्गीय आवाज कानी पडतो आणि प्रेक्षक, श्रोतृवर्ग त्यात गुंग होऊन जातो, काही उत्साही प्रेक्षक तर गाणं सुरु होताच टाळया आणि शिट्यांचा गजर करीत आपल्या पसंतीची दाद म्हणून थिटरच्या पडद्याच्या दिशेने नाणी फेकत. सर्व गाण्यांची मोहिनी एक वेगळाच आनंद देऊन जाते. संगीतकार जोडीने अकॉर्डियन, व्हायोलिन, ट्रम्पेट यांचा खुबीने केलेला वापर लता-मन्नादांच्या स्वरातील जादू गीतामधील प्रत्येक शब्दाला आणि भावनांना योग्य न्याय मिळवून देते.

चंद्र, चांदण्यांमुळे तर कवीचा कल्पना विलास बहरत आला आहे. अनेक प्रेमगीते कवीच्या लेखणीतून कागदावर शब्द बद्ध झाली आहेत. हसरत जयपुरी ने अक्षररुप दिलेल्या या गीताची गोडी अवीट आहे. टिपूर चांदणे पडलेले, नीरव शांतता, वातावरणात एक विलक्षण थंड असा गोडवा, सोबत प्रियकर! आपल्या मनातल्या भावना व्यक्त करताना ती 'मेरे साजन ले चल मुझे तारोंके पार' अशी विनवणी करतेय, मनाला मनाची भाषा समजून ते दोघे जणू एकरुप झालेत. त्या विलक्षण मोहोरलेल्या क्षणात, उत्साहामध्ये नव वधू सारखे आकाश चक्क भूतलावर आणण्याची भावना त्याच्याही मनात येते. 'दुल्हन जैसा आसमा धरती पर ले आऊं मैं' अशा हया प्रेममय वातावरणात दोन जीवांची भेट झालेली दिसते असे जग ही कैफात म्हणते, 'दुल्हन कहें प्यार में दो दिल मिले' वा! किती सुंदर कवी कल्पना आणि काव्य रचना! मन अक्षरशः बहरुन जाते, असे सदा बहार अजरामर गीत बऱ्याच वेळी रात्रीच्या एकांतात, शांत क्षणी रेडिओवर 'बेला के फूल' कार्यक्रमात ऐकायला मिळतं आणि मोगऱ्याच्या वासाने जणू रात्र सुगंधीत होऊन जाते.

इतकी वर्ष झाली हे गाणं पहातोयं, ऐकतोय पण प्रत्येक वेळी ते जणू नव्या रुपात प्रसन्न, ताजेतवाने व टवटवीत वाटते हीच या गाण्याची किमया आहे.

आज राज-नर्गिस, लता-मन्नाडे, शंकर जयकिसन, हसरत जयपुरी यांपैकी कोणीच हयात नाहीत निसर्ग नियमानुसार ते कधीच काळाच्या पडद्याआड गेलेत पण त्यांच्या या गीताचा सुगंध सदैव नव्या पिढीला प्रेमाचा संदेश जगाच्या अंतापर्यंत देत राहील, कारण प्रेम हे एक सत्य आहे आणि प्रेम भावना अमर आहे.

**– नंदकुमार वढावकर**
६०२, निरंका को ऑप सोसायटी,
१२९/२६ आयडियल कॉलनी,
पौड रोड, पुणे - ४११०३८.
मोबाईल - ९८६०२०२४७२
वय - ६९ पुर्ण.

# माझे आवडते गाणे



माझे सर्वात आवडते गाणे आहे श्रावण महिन्याचे नितांत सुंदर वर्णन करणारे शांता शेळके यांच्या सिद्ध हस्त लेखणीतून नटलेले 'ऋतू हिरवा ऋतू बरवा'. सुरुवातीच्या कडव्यातच श्रावणातल्या हिरवाईला शांताबाई पाचूची उपमा देतात व आपल्या समोर श्रावणातला हिरवागार निसर्ग उभा राहतो. श्रावण सरी निसर्गाबरोबरच तनमनाला एक नवी झळाळी प्राप्त करुन देतात. श्रावणातल्या ऊन पावसाचे वर्णन करताना शांताबाई म्हणतात 'भिजूनी उन्हे चमचमती, क्षण दिपती क्षण लपती' हे वर्णन वाचल्यावर पानांवर पडून चमचमणाऱ्या पाऊस बिंदूंची आठवण होते व नकळत आपले मन मृदगंधाचा वेध घेते.

नंतरच्या कडव्यात श्रावणाला शांताबाई अवखळ प्रियकराची उपमा देतात. हुरहुर लावून नंतर मनोमन भेटणाऱ्या प्रियकराची ओढ शांताबाई हळुवार शब्दात व्यक्त करतात. श्रावणात हमखास आढळणाऱ्या इंद्रधनुष्याला - प्रियकर गगन आणि प्रेयसी पृथ्वी यांना जोडणारा सहज सुंदर दुवा आहे अशी उपमा त्या देतात. ती सर्वार्थाने योग्य वाटते. हया गाण्याला स्वर दिला आहे ८३ व्या वर्षीही देशापरदेशात चिरतरुण आवाजात गाणं म्हणणाऱ्या आशाताई हयांनी! हिरव्या श्रावणाचे वर्णन त्यांच्या टवटवीत, सदाबहार आवाजात असल्यामुळे आपल्याला निसर्गाच्या अधिक जवळ नेते. शेवटच्या कडव्यात जेव्हा इंद्रधनुष्याचे वर्णन आपण ऐकतो तेव्हा त्यांच्या स्वरांबरोबर आपले मन नकळत इंद्रधनुष्याचा गोफ आकाशात शोधायला लागते व आपण त्या स्वरांना सलाम करतो.

दोन कडव्यांना जोडताना संगीतकार श्रीधर फडके यांनी संतूरचा केलेला वापर यामुळे उत्तम वातावरण निर्मिती होते. गाण्यात असलेली कोरसची साथ आणि त्यातून सरसर वर चढत जाणारा विलक्षण फिरत असलेला आशाताईचा आवाज गाण्याला एका उंचीवर नेऊन ठेवतो. वैशाख वणव्यातही आपण हे गाणं ऐकलं तरी मनावर आनंदाची रिमझिम बरसात होते 'श्रावण सरींसारखी'.

**- सौ. वरदा शेखर भिडे**
२०१, निरंका को ऑप सोसायटी,
१२९/२६ आयडियल कॉलनी,
पौड रोड, पुणे - ४११०३८.
मोबाईल - ९८२२८४१८३६.
वय - ५२ पुर्ण.





# भरलेले कारले

## कृतीः

१. प्रथम कारले स्वच्छ धुवून घ्या.

२. नंतर कारल्यातील बिया काढून नीट धुवा.

३. कारले (कारला) आतील बिया काढून टाकल्यानंतर शॅलो फ्राय करा.

४. कारल्याच्या आत भरण्यासाठीः

- खोबरे, कांदे आणि काही शेंगदाणे तळून घ्या.
- थोडावेळ थंड होऊ द्या आणि त्यात हिरवी मिरची, थोडे मीठ, कोथिंबीर, कढीपत्ता, तीळ, जिरे सोबत बारीक करा.)

५. एक स्वादिष्ट सुगंध येईपर्यंत स्टफिंग १० मिनीटे चांगले परतून घ्या.

६. सारण भरल्यानंतर, अर्धा चमचा तेलाने पॅनमध्ये साधारण ५/७ मिनीटे पुन्हा शिजवा.

७. कोथिंबीर घालून सर्व्ह करा.

- ईशान शेरेकर

# वाढदिवस



५ मे सौ. सोनाली भापकर आणि २५ मे श्रीकांत पवार



२२ जून महेश कोंडे




६ जुलै अविनाश खरमाटे आणि ७ जुलै महेंद्र वाघ

# सोहळा




**१४ मे** रोजी संदीप, वैभव आणि कविता हा कार्यक्रम राजेश व्यास ग्रुपतर्फे प्रस्तूत करण्यात आला.

# रणजित हाईटस् फ्लॅट हस्तांतरण

**३ जून** रोजी रणजित हाईटस् सोसायटीमधील फ्लॅट फ्लॅटधारकांना हस्तांतरीत करण्यात आले.










VYAS
Rajesh Vyas Group





















# रणजित हाईटस् सोसायटी हस्तांतरण

VYAS
Rajesh Vyas Group

**१५ जुलै** रोजी रणजित हाईटस् सोसायटी हस्तांतरीत करण्यात आली.
















# भुमिपूजन

**ओंकार** या आमच्या नवीन प्रकल्पाचा भुमिपूजन सोहळा सौ. जावळे व श्री. रविंद्र जावळे यांच्या हस्ते नुकताच पार पडला.
यावेळी मा. नगरसेवक श्री. जयंत भावेसाहेब उपस्थित होते. तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते.







































Project by
VYAS
Rajesh Vyas Group
Omkar
Karvenagar

VYAS
Rajesh Vyas Group



**सौ. मृदुला थोरात**
३१ आयडियल सोसायटी,
आयडियल कॉलनी,
पौड रोड, पुणे - ४११०३८.
मोबाईल - ९५०३०१७९३०
वय - ७४ पुर्ण.

# आषाढी एकादशी

**आषाढ शुद्ध एकादशी।**
**देव शयनी की हो जाती।**
**आज यात्रा पंढरीची।**
**गर्जे नगरी विठुरायाची।**
**विठूनामाच्या गजरी।**
**अवघी दुमदुमली पंढरी।**
**टाळा, मृदंग, वाजे वीणा।**
**पंढरीचा सोहळा आगळा।**
**हरिनामात भक्त आसक्त।**
**बेभान नाचती निरासक्त।**

- सौ. मृदुला थोरात



## लहान मुलगा योगा करताना

**नावः साईज्ञ शेडगे** (व्यास बिल्डकॉन प्रा. लि. चे कर्मचारी श्री. विशाल शेडगे यांचा मुलगा)

**वयः ४ वर्षे**

**इयत्ताः नर्सरी**








## लहानपणापासून असलेली चित्रकलेची आवड




**नावः तन्वी भापकर**

(व्यास बिल्डकॉन प्रा. लि. च्या कर्मचारी सौ. सोनाली भापकर यांची मुलगी)

**वयः १४ वर्षे**

**इयत्ताः १० वी**

# साईट अपडेटस्



**सुधेंदु** ही साईट पूर्णत्वाकडे पोहोचली आहे. साधारणतः सप्टेंबरमध्ये हस्तांतरीत केली जाईल. या साइटची १००% फ्लॅट विक्री पूर्ण झालेली आहे.




**३१ आयडियल** या साईटचे काम सुरु झाले आहे. साधारणतः ऑक्टोबर, २०२४ मध्ये हस्तांतरीत केली जाईल. या साइटची ८६% फ्लॅट विक्री पूर्ण झालेली आहे.



**स्वप्नाली** या साईटचे काम सुरु झाले आहे. या साईटची ५४% फ्लॅट विक्री पूर्ण झालेली आहे.

**ओंकार** या साईटचे काम सुरु झाले आहे. या साईटची १००% फ्लॅट विक्री पूर्ण झालेली आहे.



# वाचकांसाठी आवाहन

## राजेश व्यास ग्रुप

तर्फे **तिमाही वृत्तपत्रिका** (Quarterly Newsletter)
काढण्याचे ठरविले आहे. त्यात आपले योगदान असावे / सहभाग असावा असे आम्हांस वाटते.

पुढील वृत्तपत्रिकेचा विषय आहे

## 'बांधकाम व्यावसायिक'

यांत आपण लेख, कविता, अनुभव लिहू शकता. चित्र किंवा कार्टुन काढू शकता.
चुटकुले, चारोळी लिहू शकता. भाषेचे बंधन नाही. (इंग्लिश, मराठी, हिंदी)
यांवर आपले संपूर्ण नाव, सोसायटीचे नाव, वय असणे गरजेचे आहे.

तसेच लहान म्हणजे इयत्ता १०वी पर्यंतच्या मुलांसाठी सुद्धा एक विभाग ठेवला आहे.
त्यात आपल्या मुलांनी काढलेले चित्र किंवा तयार केलेली प्रतिकृती यांचा फोटो, तसेच
जर कोणी नृत्य करत असतील तर त्याचा फोटो देवू शकता. याकरिता विषयाचे बंधन नाही.
यांवर पाल्याचे संपूर्ण नाव, पाल्याचे वय, पाल्य शिकत असलेली इयत्ता, आपले संपूर्ण नाव,
पाल्याशी असलेले नाते, सोसायटीचे नाव, असणे गरजेचे आहे.

हे सर्व आपल्याला दि. २० ऑक्टोबर २०२३ पर्यंत ऑफिसमध्ये Soft copy / Hard copy
कोणत्याही स्वरुपात पाठवायचे आहे.
hr@rajeshvyasgroup.com या ईमेल आयडी वर Soft copy पाठवावी तसेच,
Hard copy ऑफिसमध्ये आणून द्यावी.

This newsletter is available on
**vyasbuildcon.com**

VYAS
Rajesh Vyas Group


sales@rajeshvyasgroup.com
020 3504 2100
4th floor, Geetai Sankul, Above Reliance Digital,
Ideal Colony, Paud Road Kothrud, Pune - 411038